सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४


## संक्षिप्त वृत्त



### कल्याणशेट्टी महाविद्यालयात आनंद मेळावा

**अक्कलकोट :** महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सुरेखा कल्याणशेट्टी कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शनिवार (दि ७)डिसेंबर रोजी आनंद मेळावा उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. सुरुवातीला संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते फित कापून आनंद मेळाव्याचा उद्घाटन करण्यात आला. यामध्ये इयत्ता ११ वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाद्यपदार्थ उदा. कस्टर्ड,दाल-चावल, बटाटे वडे, वडापाव, पाणीपुरी, भेळ, कचोरी, पावभाजी, सँडविच कच्ची दाबेली अशा विविध खाद्यपदार्थांची अतिशय सुंदर अशी मांडणी करून ठेवले होते. तसेच लिंबू शरबत, उसाचा रस, गुळाचा चहा आधी पेय सुद्धा ठेवले होते. मेळाव्यास संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, रुपाली शहा, पूनम कोकळगी, प्रा मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

### अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मोहोळच्या अध्यक्षपदी रशीदा शेख



**मोहोळ :** अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुका अध्यक्षपदी रशीदा शेख(कुरुलकर )यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष सुर्यमणी गायकवाड यांनी शेख यांना तसे निवडीचे पत्र दिले व त्यांचा सत्कार करण्यात आला. सोलापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष सूर्यमणी गायकवाड, सरला चाबुकस्वार, कांचन पांढरे, मोहोळ तालुक्यातील उपस्थित सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस, अनुसया राठोड, संयोगिता दळवी, दिपाली ढोबळे, शमशाह तांबोळी, दिपाली कदम, पद्मिनी मस्के, वेणूताई वाघमोडे, सोनाली पाटील मैना चौरे राणी गुंड सारिका सनगर समीना जमादार उषा मोठे प्रतिभा जाधव अंजली घोडके तालुक्यातील सर्व बीट प्रमुख आणि मोहोळ तालुक्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होत्या. या निवडी बद्दल रशिदा शेख यांचे अभिनंदन होत आहे

### शासकीय कामकाजात अडथळा; करमाळ्याच्या चौघांविरोधात गुन्हा

**करमाळा :** न्यायालयाने स्थगिती दिलेल्या जागेत केलेले अतिक्रमण काढण्यासाठी सांगत असताना शासकीय अधिकाऱ्यांना प्रतिबंध करून, शासकीय कामकाजात अडथळा आणल्याबद्दल करमाळ्यातील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत करमाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी करमाळा पोलिसांत फिर्याद दिली आहे. (दि.४) डिसेंबर रोजी तपसे यांनी दिलेल्या या फिर्यादीत म्हटले आहे की, करमाळा शहरातील नगरपरिषदेच्या हद्दीतील गट नं. २१६ मध्ये भवानी नाका ते देवीचामाळ रस्त्यावरील अतिक्रमणांना बार्शी न्यायालयाने स्थगिती दिलेली होती. त्यामुळे ४ डिसेंबर रोजी दुपारी १ च्या सुमारास ते करमाळा नगरपरिषदेचे नगररचना सहायक शशांक भोसले यांच्या सोबत सदर जागेवर कोणी अतिक्रमण केले आहे का, याची पाहणी करत होते. दरम्यान सदर जागेवर बुवा धनवे, सचिन गायकवाड, अजय खंडागळे व शेखर हेरकर यांनी पत्राशेड मारून अतिक्रमण केलेले निदर्शनास आले. त्यामुळे या चौघांना न्यायालयाने स्थगिती दिलेल्या जागेत केलेले अतिक्रमण काढावे लागेल असे सांगत असताना त्यांनी तपसे यांना प्रतिबंध करून शासकीय कामकाजात अडथळा आणला. मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी या चौघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे पुढील तपास करत आहेत.

### टॅक्टर अंगावरुन गेल्याने, आई अन लेकीचा मृत्यू

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील आष्टे येथे अंगावरून टॅक्टरचे चाक गेलेने आईसह चार वर्षाची मुलगी असे दोन जण ठार झाले ही घटना सात डिसें रोजी सायं ६.१५ वाजणेच्या सुमारास घडली याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहीती नुसार सुनिल गुलाबराव राठोड रा डिगरस ता कंदार जिल्हा नांदेड हा टॅक्टर चालवत होता तो त्याच्या ताब्यातील टॅक्टर एम एच २४ डी ७१ ४५ चालू ठेवून खाली उतरला होता तेव्हा निता राजू राठोड वय वर्ष २० हीने आपली मुलगी अतिश्री राजू राठोड वय ४ वर्षे दोघी रा पाटागुडा ता जिवती जिल्हा चंद्रपूर हिस कंबरेवर घेवून टॅक्टर मध्ये चढत असताना अचानक टॅक्टरचा गीअर पडला व टॅक्टर सुरु झाला व तसाच पुढे गेलेले टॅक्टरचे चाक निता व अतिश्री च्या अंगावरून गेलेले दोघींही गंभीर जखमी होवून जागीच मयत झाल्या ही घटना आष्टे (ता मोहोळ ) येथील कुंडलीक गावडे यांच्या शेताजवळ घडली त्यामुळे ट्रॅक्टरचा चालक सुनिल गुलाबराव राठोड रा डिगरस ता कंदार जिल्हा नांदेड हा स्वतःच्या ताब्यातील टॅक्टर तसेच चालू ठेवून खाली उतरला त्याच्या निष्काळजीपणामुळे तो त्या दोघींच्या मयतास कारणीभुत ठरल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.

### जिल्हा सत्र न्यायालयच्या वरिष्ठ लिपीकपदी उमेश बिराजदार



**अक्कलकोट :** तालुक्यातील बोरी उमरगे येथील एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या उमेश मल्लिकार्जुन बिराजदार यांची जिल्हा सत्र न्यायालय, सोलापुर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त करण्यात आल्याने ग्रामस्थ वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. मल्लिकार्जुन बिराजदार हे अत्यंत गरिबी परिस्थितीतून नवी मुंबई येथील भाजी मंडई मध्ये मिळेल ते काम करून उमेश व महेश या दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिले.एक मुलगा अक्कलकोट पोष्ट खात्यात कार्यरत असून आत्ता उमेश हे जिल्हा सत्र न्यायालय, सोलापुर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त झाल्याबद्दल बोरी उमरगे या पंच क्रोशीतील जनतेने खुप अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# यंदा साखरेचा दर वाढवून मिळावा

## हिवाळी आधिवेशनात भाजपाचे राज्यसभेचे खा. धनंजय महाडिक यांची मागणी

**मोहोळ/प्रतिनिधी**



धनंजय महाडिक

राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात साखरेच्या एमएसपीबद्दल मुद्दा उपस्थित केला. २०१९ पासून साखरेची किमान आधारभूत किंमत ३ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल आहे. एकीकडे शासनाकडून दरवर्षी उसाची एफआरपी वाढवली जाते. तर दुसरीकडे साखरेचा उत्पादन खर्च, कर्मचारी पगार, कर्जाचे व्याज यामुळे साखर कारखान्यांवरील आर्थिक बोजा वाढत चालला आहे. परिणामी साखरेच्या किमान आधारभूत किमतीमध्ये ४,२०० रुपये प्रतिक्विंटल इतकी वाढ करावी, अशी मागणी खासदार महाडिक यांनी केली. खासदार महाडिक यांनी राज्यसभेत देशातील साखर कारखान्यांसमोरील प्रश्नांची मांडणी केली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यासाठी एफआरपीची रक्कम दरवर्षी वाढते पण साखरेची एमएसपी वाढत नाही. त्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. याकडे त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. भारत हा जगातील सर्वात मोठा साखर उत्पादक देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत देशातील हा उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतो. देशातील १० कोटींपेक्षा अधिक ऊस उत्पादकांच्या कुटुंबांसाठी साखर उद्योग उदरनिर्वाहाचे साधन आहे. संपूर्ण देशात सुमारे ५५० साखर कारखाने असून या उद्योगातून सुमारे साडेपाच लाख लोकांना रोजगार उपलब्ध होतो. देशात दरवर्षी सुमारे ३६० ते ४०० लाख मे. टन साखरेचे उत्पादन होते. २०२२-२३ या वर्षात सुमारे ७० लाख मे. टन साखर निर्यात केली. तर देशांतर्गत साखरेचा वापर सुमारे २९० लाख मे. टन आहे. ऊस पिकाचे एकूण मूल्य ८० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. परंतु हा संपूर्ण उद्योग वेळोवेळी होणाऱ्या हवामान बदलावर अवलंबून असतो. त्यातून उद्योगाचे अनेकदा नुकसान होते. एकीकडे केंद्र सरकारने उसाची किंमत निश्चित केली आहे. एफआरपीमुळे शेतकऱ्यांचा फायदा होत आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने साखरेसाठी एमएसपी म्हणजे किमान हमीभाव ३,१०० रुपये प्रतिक्विंटल ठरवला; परंतु सात वर्षांपासून एमएसपी दरात वाढ नाही.

**चार हजार २०० रुपये एमएसपी करावी**

साखरेचा उत्पादन खर्च, तोडणी, वाहतूक, कारखान्याची देखपाल, कर्मचारी पगार, व्याज असे अनेक खर्च साखर कारखान्यांना करावे लागतात. ३,१०० रुपयांच्या एमएसपीमध्ये हा सर्व खर्च भागविणे कारखान्यांना शक्य नाही. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेच्या एमएसपीमध्ये ४,२०० रुपयांपर्यंत वाढ करावी, अशी मागणी इस्मा, नॅशनल शुगर फेडरेशन व महाराष्ट्र साखर संघाने केली आहे. त्यातून शेतकऱ्यांना दोन पैसे जादा मिळतील व तोट्यात असलेल्या कारखान्यांना उभारी मिळेल, असा विश्वास खासदार महाडिकांनी व्यक्त केला.

## बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासही महत्त्वाचा

### खरी गुणवत्ता ग्रामीण भागातच - डॉ. अशोक हिप्परगी

**अक्कलकोट/प्रतिनिधी**




पंचायत समिती शिक्षण विभाग, अक्कलकोटच्या वतीने बसवराज हायस्कूल, करजगी येथे करजगी बीटस्तरीय क्रिडा स्पर्धे च्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी हिप्परगी क्लीनिक, मंगरूळचे डॉ. अशोक हिप्परगी यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासही महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी क्रीडा कौशल्यात नैपुण्य मिळवावे याकरिता शिक्षकांची तळमळ आहे असे मत व्यक्त केले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्ताराधिकारी सोमशेखर स्वामी होते. डॉ. अशोक हिप्परगी व सुनीता हिप्परगी यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर बसवराज हायस्कूलचे संतोषकुमार उंबरजे सर, मंगरूळचे केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे , जेऊरचे केंद्रप्रमुख कृष्णात मोरे, तडवळ व मुंढेवाडीचे केंद्रप्रमुख गौतम कांबळे , जिल्हा संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, शिक्षक संघाचे जिल्हा संपर्कप्रमुख अभिजीत सुर्डीकर, अक्कलकोट पतसंस्थेचे चेअरमन मंजुनाथ भतगुणकी , शिक्षक समितीचे अध्यक्ष शंकर अजगोंडे, शिक्षक नेते होन्नप्पा बुळ्ळा व विद्याधर शिवशरण आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अशोक हिप्परगी यांचेतर्फे विजेते व उपविजेते संघांना सन्मानचिन्ह , प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरवण्यात आले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी व्यंकप्पा शेंडगे, बसवराज कोळी,बिरप्पा वाघमारे, इसाक नागणसूरे, बसवराज परतबादी, सादिक तांबोळी, विलास तद्देवाडी, गंगाधर जमादार, शांतमल्लय्या स्वामी, रेवणसिद्ध कोर्सेगाव, प्रवीण राठोड, पंडित आंदेवाडी, बाबुराव पवार, सर्जेराव माशाळे, संजय बनसोडे, सतीश पटेद, संजय उंबरजे, विठोबा हलसंगी, अशोक बेल्लद, काशिनाथ विजापुरे, विभावरी आग्रे, अर्चना क्षीरसागर आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी करजगी बीटमधील मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक व खेळाडू बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोषकुमार मनगोंडे यांनी केले व आभार विनोद कोळी यांनी मानले.



## पाकणी येथे श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती

**उत्तर सोलापूर :** उत्तर तालुक्यातील पाकणी येथे उत्तर तालुका कृषि अधिकारी कार्यालय उत्तर सोलापूर यांच्या माध्यमातून पाकणी- सावळेश्वर हद्दीवरील नाल्यावर वनराई बंधारा श्रमदानातून बांधण्यात आला. यावेळी उत्तर तालुका कृषि अधिकारी धनंजय शेटे यांनी वनराई बंधाऱ्याचे महत्व उपस्थित शेतकरी आणि कर्मचारी यांना सांगितले.परतीच्या पावसाने वाहून जाणारे पाणी अडविणे, मुरविणे आणि भूगर्भातील पाणीसाठा वाढविणे, या सोबत साठलेल्या पाण्याचा नाल्याच्या काठावरील उभ्या असलेल्या रब्बी पिकांना पाणी देणे, जनावरांना पिण्याचे पाणी इत्यादी बाबींसाठी या साठविलेल्या पाण्याचा उपयोग होतो. सर्व शेतकऱ्यांनी असे लहान वनराई माती बंधारे उभारावेत असे आवाहन त्यांनी केले.यावेळी मंडल कृषी अधिकारी श्रीमती शिल्पा कसबे मॅडम, कृषि पर्यवेक्षक- राहुल मोरे, कृषि पर्यवेक्षक-विजय भाले, कृषि सहायक -राहुल माने, लक्ष्मण भोई, कशिलिंग नंदर्गी, तृप्ती गुंड, शितल पवार, स्मिता काळे, प्रियांका गरड, सागर येलगुंडे, सतीश येळगुंडे, बालाजी लक्ष्मण येळगुंदे, संजय सुरवस्कर उपस्थित होते.

## शटडाऊनमुळे शहराला एक दिवस उशिरा पाणीपुरवठा

**सोलापूर :** सोलापूर शहराचा पाणीपुरवठा वीजविषयक कामांमुळे बुधवार दिनांक ११ डिसेंबरपासून एका रोटेशन करिता एक दिवस उशिरा होणार आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस १३२ केव्ही मंद्रूप सबस्टेशन मधील ३३ केव्ही ब्रेकर सर्व्हिसिंग/ओव्हर हॉलिंग करणे व लाईन मेन्टेनन्स करण्याकरीता बुधवार, दि.११ डिसेंबर रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे टाकळी हेड वर्क्स ते सोलापूर येथील पंप हाऊसकरीता १३२ केव्ही मंद्रूप सबस्टेशनहून येणारी ३३ केव्ही लाईन बंद राहणार आहे.

या कामामुळे टाकळी हेड वर्क्स येथून पाण्याचा उपसा कमी होणार आहे. परिणामी बुधवार, दि.११ डिसेंबर रोजीचा शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने व तसेच १ रोटेशन पाणीपुरवठा पुढे जाणार आहे.तरी कृपया नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाने केले आहे.

## फळवणी येथे कॅनॉलचे पाणी चोरले; तिघा शेतकऱ्यांवर गुन्हा

**वेळापूर :** फळवणी (ता.माळशिरस) येथील नीरा उजवा कालव्यामधून पाणी चोरल्याची घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी वेळापूरच्या पोलिसांनी तांदूळवाडी येथील तिघा शेतकऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात पाटबंधारे विभागाचे अथर्व विजय चक्के (रा.भाळवणी ता.पंढरपूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी नागेश रघुनाथ काकडे, शिवाजी पिराजी जाधव आणि आबासाहेब मच्छिंद्र रणदिवे (सर्व रा. तांदूळवाडी ता.माळशिरस) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या तिघांनी मिळून रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शासनाची परवानगी न घेता फळवणी येथील ब्रँड दोनच्या दरवाजे उघडून सुमारे २७ हजाराचे पाणी चोरी आणि नुकसान केले होते. हा प्रकार घडल्यानंतर फळवणी कालव्याचे कर्मचारी चैतन्य खेकाळे यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पाटबंधारे विभागाकडे त्याचा रिपोर्ट पाठविला होता. त्याप्रमाणे अथर्व चक्के यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पुढील तपास हवालदार राजगे करीत आहेत.

## पिलीव येथे तीन ठिकाणी चोऱ्या; ४ अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथे एकाच रात्री तीन ठिकाणी चौघां चोरट्यांनी घरफोडी करून रोख रकमेसह ५५ हजाराचा माल पळवला.ही चोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात मनोहर मच्छिंद्र माळी (वय ५२ रा.मेनपेठ पिलीव) यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी ४ चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मनोहर माळी हे रात्री घरात झोपले होते चोरट्यांनी त्यांच्या दरवाजा ढकलून घरात प्रवेश केला आणि पिशवीतील २० हजार रुपये पळवले.त्यापूर्वी चोरट्याने गावातील रघू देवकर आणि कस्तुरे यांचे बंद घर फोडले होते. त्या ठिकाणी सोन्याचे दागिने , १५ हजार रुपये रोख आणि टीव्ही असा एकूण ५५ हजाराचा माल गेल्याची नोंद पोलिसात झाली. हवालदार इगडे पुढील तपास करीत आहेत.

## भांम, मांडवे एसटी बस शालेच्या वेळेनुसार स्थानकात यावी

### अन्यथा आगार प्रमुख कार्यालया समोर धरणे आंदोलन करणार...!

**वेळापूर/प्रतिनिधी**

भांम (ता.माळशिरस) एसटी बस हे विद्यार्थ्याचे प्रवासाचे प्रमुख साधन म्हटले जाते. परंतू नातेपुते येथून भांम ला येणारी एसटी बस शालेय वेळेनुसार येत नसल्याने, विद्यार्थ्यांचे गैरसोय होत असल्याने यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्ष मांडवेच्या वतीने वाहतूक व्यवस्था रायबान यांच्या कडे निवेदनाद्वारे पत्र देण्यात आले. भांम,मांडवे, येथे एसटी बस सकाळी वेळेवर येते, परंतु दुपारी व सायंकाळी शालेय वेळेवर येत नसल्याने विध्यार्थी, विद्यार्थिनींचे एसटी बसची वाट पाहत ताटकळत बसावे लागत आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी नातेपुते येथून मांडवे येथे दुपारी१वाजेपर्यंत व सायंकाळी ५:३० वा.पर्यंत यावी.तसेच शुक्रवारी भांम येथे मुक्कामी एसटी बस यावी.शनिवारी सकाळी ७:३०वाजेपर्यंत मांडवे येथे एसटी बस यावे अन्यथा आगार प्रमुख कार्यालया समोर पार्टीच्या वतीन धरणे आंदोलन करणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण(तात्या) धाईंजे, तालुका उपाध्यक्ष महादेव गायकवाड, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, युवक अकलूज अध्यक्ष अभिजीत वाघमारे, वेळापूर युवक अध्यक्ष स्वप्निल सरवदे, सागर कांबळे, भगवान भोसले, दादासाहेब बोडरे, बापूराव कांबळे, दादा काळे, अनिकेत कांबळे, तसेच रत्नप्रभावती मोहिते पाटील विद्यालय मांडवे विद्यार्थिनी,विद्यार्थी यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. पालक विद्यार्थी उपस्थित होते.



नातेपुते बस डेपोन मांडवे येथील शालेय विद्यार्थानसाठी वेळेवर बस सोडाव्यात अशी निवेदना द्ववारे आर पि आय मांडवे, यांनी केली आहे.

**शालेय विद्यार्थ्यांसाठी बस वेळापूर येथे वेळेवर याव्यात.**

एसटी बस शालेय वेळेनुसार बदल करावा यासाठी यापूर्वी निवेदने देऊनही दखल एसटी आगार प्रमुख यांनी घेतली नाही.दरम्यान अकलुज सांगोला व सांगोला अकलुज बस वेळापुर एसटी स्टँडवर येत नाहीत.त्या बस स्टँडवर याव्यात वेळापुर वरुन अकलुजला येणारी बस सकाळी ७:३० ते ८वाजेपर्यंत यावी.